# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:05.05.2025** **वार:सोमवार**

---

1. वेव्हज परिषदेचा मुंबईत काल समारोप
2. तांदूळाच्या भारतीय जिनोम संवर्धित दोन वाणांच लोकार्पण
3. जागतिक बँक भूमी संमेलनामध्ये भूमी सुधारणा चर्चासत्राचं नेतृत्व भारताकडे
4. आशियाई विकास बँकेच्या नियामक मंडळाच्या 58व्या वार्षिक बैठकीला आजपासून इटलीमध्ये सुरुवात आणि
5. खेलो इंडियाच्या सातव्या आवृत्तीला कालपासून सुरुवात. स्पर्धेतील सर्वसाधारण विजेतेपदाच्या हॅटट्रिकसाठी महाराष्ट्र सज्ज

**<u>Waves समारोप</u>**

गेल्या 4 दिवसांपासून मुंबईत सुरू असलेल्या WAVES अर्थात वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल अँड एंटरटेनमेंट समिटचा काल समारोप झाला. देशवासियांच्या उदंड प्रतिसादामुळं या परिषदेचं रूपांतर एका महालाटेत झाल्याचं मत माहिती प्रसारण खात्याचे सचिव संजय जाजू यांनी आकाशवाणीशी बोलताना व्यक्त केलं. परिषदेच्या आयोजनाबद्दल समाधान व्यक्त करताना ते म्हणाले...

**अपने आप में एक अविस्मरणीय रहा है। ना केवल इंटरनेशनल पार्टिसिपेशन बहुत जोरदार था साथ ही साथ बिजनेस भी बहुत हुआ है इन्वेस्टमेंट अनाउंसमेंट हुए है आह वे इस बाजार में खरीद फरोख्त हुई है। वर्ल्ड के टॉप मीडिया एंटरटेनमेंट कंपनी यहाँ पर शामिल रही कल्चरल प्रोग्राम बहुत अच्छे रहे किसी किस्म का हमें कोई कंप्लेंट यहाँ पर नहीं मिला और अपने आप में एक पीपल्स वेव बन के निकल के आया है ये पहला एडिशन थैंक यू वेरी मच।**

WAVES2025 बद्दलचा अधिक वृत्तांत आमच्या प्रतिनिधीकडून...

**पहिल्यावहिल्या WAVES ला या क्षेत्रातल्या विविध लोकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. WAVES चा एक भाग म्हणून आयोजित केलेल्या WAVES Bazaar मध्ये या चार दिवसांमध्ये 1 हजार 300 कोटींपेक्षा अधिक रकमेची उलाढाल झाली. WAVESX च्या माध्यमातून 15 ते 16 स्टार्टअप्सची गुंतवणूकदारांशी चर्चा सुरू असून यातून 50 कोटी रुपयांची गुंतवणूक होण्याची अपेक्षा आहे. राज्य सरकारने या परिषदेत सुमारे 8 हजार कोटी रुपयांचे विविध सामंजस्य करार केले. परिषदेच्या शेवटच्या दिवशी काल हजारो लोकांनी इथल्या प्रदर्शनांना भेट देऊन माध्यम, तंत्रज्ञान, तसंच आणि मनोरंजन क्षेत्रात सध्या सुरू असलेलं काम आणि घडामोडी जाणून घेतल्या. याशिवाय WAVES मध्ये झालेल्या विविध स्पर्धेतल्या अंतिम फेरीतल्या विजेत्यांचं सादरीकरणही काल झालं. वाह उस्ताद, सिंफनी ऑफ इंडिया, Battle of Bands आणि EDM चॅलेंजच्या विजेत्यांच्या सादरीकरणाला प्रेक्षकांचा जोरदार प्रतिसाद मिळाला. आकाशवाणी बातम्यांसाठी, मुंबईहून, अंकिता आपटे.**

**<u>कृषिमंत्री</u>**

भारतीय कृषी संशोधन परिषदेतर्फे विकसित करण्यात आलेल्या भारतीय जिनोम संवर्धित तांदुळाच्या दोन वाणांचं लोकार्पण केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यानी काल नवी दिल्लीत केलं. देशाच्या दृष्टीनं हा दिवस ऐतिहासिक असून, या भारतीय वाणांमुळे धानाच्या पिकाचं उत्पादन वाढेल आणि उत्पादन खर्चात घट होईल असं चौहान म्हणाले तसच हे संशोधन करणाऱ्या कृषी शास्त्रज्ञांचं त्यांनी अभिनंदन केल.

**<u>संमेलन</u>**

अमेरिकेत वॉशिंग्टन इथं आजपासून 8 मे पर्यंत आयोजित करण्यात आलेल्या जागतिक बँक भूमी संमेलनामध्ये भारत भूमी सुधारणा चर्चासत्राचं नेतृत्व करणार आहे. पंचायत राज मंत्रालायचे सचिव विवेक भारद्वाज यांच्या नेतृत्वाखालील भारताचं प्रतिनिधी मंडळ यात भाग घेणार असून भूमी स्वामित्व योजनेचं सादरीकरण करणार आहे. 'हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर भूमीचं रक्षण आणि स्वामित्व हक्क याबाबत जागृतीकडून कृतीकडे' ही यावर्षीच्या संमेलनाची मध्यवर्ती संकल्पना आहे. भारतात जमिनीचा मालकी हक्क सुरक्षित करण्यासाठी भारत सरकारच्या वतीनं स्वामित्व ही योजना राबवण्यात आली. यामध्ये ड्रोन आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे ग्रामीण भागातील मालकी हक्काच्या शेतजमीन आणि इतर जमिनीची मोजणी करण्यात आली आणि देशातल्या 1 लाख 60 हजार गावांमध्ये सुमारे 2 कोटी 44 लाखांपेक्षा जास्त मालकीहक्क जमिनीची कार्ड वितरित करण्यात आली आहेत.

**<u>हवाईदल प्रमुख</u>**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल नवी दिल्लीत वायु दल प्रमुख एअर चीफ मार्शल एपी सिंग यांच्याशी चर्चा केली.

**<u>संरक्षणमंत्री</u>**

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आज दिल्लीत  जपानचे संरक्षण मंत्री जनरल नाकातानी यांच्याशी द्वीपक्षीय बैठक घेणार आहे. या बैठकीत उभय देशांदरम्यान सध्याच्या प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय सुरक्षा परिस्थितीवर चर्चा आणि कल्पनांची देवाणघेवाण करतील आणि द्वीपक्षीय संरक्षण सहकार्य अधिक दृढ करण्याच्या मार्गांवर चर्चा करतील असं संरक्षण मंत्रालयानं प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. उभय देशांदरम्यान संरक्षण आणि सुरक्षा हे महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत. गेल्या वर्षी दोन्ही नेत्यांदरम्यान पहिल्यांदा यासंदर्भात चर्चा झाली होती.

**<u>उपराष्ट्रपती</u>**

उपराष्ट्रपती जगदीप धनखड आज कर्नाटकच्या एक दिवसाच्या दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यात उपराष्ट्रपती कर्नाटकातील उत्तर कन्नड जिल्ह्यातील सिरसी इथल्या वनीकरण महाविद्यालयाला भेट देतील.

**<u>सीतारामन एडीबी</u>**

आशियाई विकास बँकेच्या म्हणजेच एडीबीच्या नियामक मंडळाच्या 58व्या वार्षिक बैठकीला आजपासून इटलीमध्ये सुरुवात होणार आहे. या चार दिवसीय बैठकीत अर्थमंत्री निर्मला सीतारामन भारतीय शिष्टमंडळाचं नेतृत्व करणार आहे. भविष्यातील लवचिकतेसाठी सीमापार सहकार्य यावरील चर्चेत सीतारामन सहभागी होतील. त्याचबरोबर, एडीबीचे अध्यक्ष, आंतरराष्ट्रीय शेती विकास निधीचे अध्यक्ष आणि जपान बँक फॉर इंटरनॅशनल कोऑपरेशनच्या गव्हर्नर यांच्यासमवेत बैठका घेतील, तसंच सीतारामन इटली, जपान आणि भूतान च्या अर्थमंत्र्यांशी द्वीपक्षीय चर्चादेखील करणार आहेत. त्याचबरोबर

मिलानमधल्या भारतीय समुदायाशीही त्या संवाद साधणार आहेत. तसंच बोकोनी विद्यापीठातल्या एका चर्चासत्रालाही सीतारामन उपस्थित राहाणार आहेत.

**उपराष्ट्रपती**

विकसित भारताचा मार्ग शेतकऱ्यांच्या शेतातून जातो. म्हणूनच, शेतकऱ्यांच्या जीवनात बदल आणि समृद्धी आणण्यासाठी योगदान देण्याची जबाबदारी कृषी क्षेत्रात काम करणाऱ्या संस्था आणि विद्यार्थ्यांची आहे, असं मत उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी व्यक्त केलं. ते काल मध्य प्रदेशातील ग्वाल्हेर इथल्या राजमाता विजयाराजे सिंधिया कृषी विद्यापीठातील विद्यार्थी आणि प्राध्यापकांच्या संवादात्मक कार्यक्रमात बोलत होते. शेतकरी केवळ पीक उत्पादक राहू नयेत, तर ते कृषी-उद्योजक बनतील यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. कृषि विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञान आणि संशोधनाचा वापर करून कृषी क्षेत्रातील व्यवस्थापक बनण्याचं आवाहन उपराष्ट्रपतींनी केलं. राज्यपाल मंगूभाई पटेल, मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव, केंद्रीय ईशान्य प्रदेश संचार आणि विकास मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया आणि विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. अरविंद कुमार शुक्ला हे या कार्यक्रमाला उपस्थित होते.

**इस्रायल**

येमेनच्या हुथी बंडखोरांनी काल इस्रायलच्या दिशेनं डागलेलं एक क्षेपणास्त्र इस्रायलच्या मुख्य आंतरराष्ट्रीय विमानतळ असलेल्या बेन गुरियन विमानतळाजवळ कोसळलं, ज्यामुळं प्रवाशांमध्ये घबराट पसरली. तर विमान उड्डाण पुन्हा सुरू झालं असल्याचं इस्रायल विमानतळ प्राधिकरणाच्या प्रवक्त्यानं सांगितलं आहे. दरम्यान, इस्रायलच्या विमानतळाजवळ झालेल्या या क्षेपणास्त्र हल्ल्यामुळे, एअर इंडियानं उद्यापर्यंत इस्रायलमधून भारतात येणारी आणि जाणारी सर्व विमान उड्डाणं निलंबित केली आहे. प्रवाशांच्या आणि कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

**नक्षल अटक**

महाराष्ट्र राज्य दहशतवादविरोधी पथकानं रायगडमध्ये चव्वेचाळीस वर्षांच्या एका नक्षलवाद्याला अटक केली आहे. प्रशांत कांबळे उर्फ लॅपटॉप असं त्याचं नाव असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. शहरी नक्षलवादी प्रकरणाशी तो संबंधित असून 2011 पासून त्याचा शोध सुरू असल्याचंही पोलिसांनी सांगितलं.

**चाचणी नीट**

राष्ट्रीय चाचणी संस्थेच्या वतीनं काल देशातल्या पाच हजार केंद्रावर आणि परदेशातील 13 शहरांमध्ये राष्ट्रीय पात्रता आणि प्रवेश परीक्षा अर्थात नीट 2025 पार पडली. या परीक्षेसाठी साडेबावीस लाखांहून अधिक उमेदवारांनी नोंदणी केली होती.

**महिलाहॉकी**

भारत-ऑस्ट्रेलिया महिला हॉकी संघादरम्यान ऑस्ट्रेलिया इथं झालेल्या मालिकेतल्या पाचव्या आणि शेवटच्या सामन्यात भारतानं ऑस्ट्रेलियावर 1-0 असा विजय मिळवला. उपकर्णधार नवनीत कौरने 21 व्या मिनिटाला एकमेव गोल करत संघाचा विजय साकारला. याआधीच्या सर्व चारही सामन्यात भारतीय संघाला पराभवाला सामोरं जावं लागलं होतं.

**आयपीएल क्रिकेट**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत काल झालेल्या सामन्यात पंजाब किंग्ज इलेव्हन संघानं लखनौ सुपर जाइंट्स संघाचा 37 धावांनी पराभव केला. तर कोलकाता नाईट रायडर्सनं राजस्थान रॉयल्सवर एका धावेनं मात केली. तर आयपीएलमध्ये आज, सनरायझर्स हैदराबाद आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यातल्या सामना संध्याकाळी साडे सात वाजता सुरू होईल.

**खेलो इंडिया**

देशात क्रीडा संस्कृती विकसित करण्यात खेलो इंडिया उपक्रमाचं महत्वाचं योगदान आहे, असं मत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केलं. बिहारमध्ये आयोजित करण्यात आलेल्या खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेचं उद्घाटन काल दूरस्थ पद्धतीनं करताना ते बोलत होते. पाटणा इथल्या पाटलीपुत्र क्रीडा संकुलात आयोजित या स्पर्धेच्या उद्घाटन सोहळ्याला हजारो खेळाडू, कलाकार आणि विद्यार्थी सहभागी झाले होते. दरम्यान, या स्पर्धेतील सर्वसाधारण विजेतेपदाच्या हॅटट्रिकसाठी महाराष्ट्र सज्ज झाला आहे. तिरंदाजीच्या कम्पाऊंडमधील रँकिंग राऊंडमध्ये काल महाराष्ट्राच्या मुलींनी अव्वल स्थानावर झेप घेत स्पर्धेत दमदार प्रारंभ केला.

**हवामान**

उत्तर कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी आज जोराचे वारे आणि वीजांसह हलका ते मध्यम पाऊस पडण्याचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. उद्यापासून नऊ तारखेपर्यंत या हवामानाची तीव्रता वाढण्याचा अंदाज आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.**